**ठळक बातम्या**

- संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला आजपासून सुरुवात; केंद्रीय उत्पादन शुल्क सुधारणा विधेयक, तसंच आरोग्य सुरक्षा आणि राष्ट्रीय सुरक्षा उपकर विधेयक लोकसभेत सादर

- देशातल्या शेअर बाजारांचा विक्रमी पातळीला स्पर्श

- रस्ते अपघातात तामिळनाडूत ११ जणांचा तर महाराष्ट्रात सोलापूर मधे पाच जणांचा मृत्यू

- दितवाह चक्रीवादळाचा जोर ओसरून कमी दाबाच्या पट्ट्यात रुपांतर

**आणि**

- दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या एकदिवसीय क्रिकेट मालिकेत पहिल्या सामन्यात भारताचा विजय

**<><><><><>**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला आजपासून सुरुवात झाली.

लोकसभेत आज कामकाज सुरू झालं तेव्हा लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी दिवंगत अभिनेता धर्मेंद्र, निवृत्त कर्नल सोना राम चौधरी, प्राध्यापक विजय कुमार मल्होत्रा आणि रवी नाईक यांना श्रद्धांजली वाहिली.

त्यानंतर लोकसभेत प्रश्नोत्तराचा तास सुरू झाल्यावर विरोधी पक्ष सदस्यांनी मतदार यादी पुनरीक्षणासह विविध मुद्द्यांवर चर्चा करण्याची मागणी करत घोषणाबाजी सुरू केली. यावर बिर्ला यांनी नाराजी व्यक्त केली आणि कामकाज सुरू ठेवण्याचं आवाहन केलं. बिर्ला यांच्या आवाहनानंतरही घोषणाबाजी सुरू राहिल्यामुळे सभापतींनी दुपारी १२ वाजेपर्यंत कामकाज तहकूब केलं. त्यानंतर सभागृहाचं कामकाज सुरू झालं तेव्हा अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी केंद्रीय उत्पादन शुल्क सुधारणा विधेयक, आरोग्य सुरक्षा आणि राष्ट्रीय सुरक्षा उपकर विधेयक, २०२५ सादर सभागृहात सादर केली. त्यानंतर विरोधी पक्षांची घोषणाबाजी सुरू राहिल्यामुळे कामकाज दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

**राज्यसभेत** आज ११ वाजता कामकाजाला सुरुवात झाली. नॅशनल कॉन्फरन्सचे गुरविंदर सिंग ओबेरॉय, चौधरी मोहम्मद रमजान आणि सज्जाद अहमद किचलू यांनी वरिष्ठ सभागृहात सदस्य म्हणून शपथ घेतली. पहिल्यांदाच राज्यसभेचे अध्यक्षपद भूषवणारे

अध्यक्ष सी.पी. राधाकृष्णन यांचं स्वागत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. राधाकृष्णन यांचा उपराष्ट्रपतीपदापर्यंतचा प्रवास लोकशाहीची खरी ताकद दर्शवतो असं मोदी यावेळी म्हणाले. यावेळी बोलताना भारतीय लोकशाहीविषयी मोदी म्हणाले….

**होल्ड… बाईट - प्रधानमंत्री**

त्यानंतर विरोधकांच्या घोषणाबाजीमुळे राज्यसभेचं कामकाजही दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

हिवाळी अधिवेशन ही फक्त एक औपचारिकता नसून त्याद्वारे देशाला विकासाकडे नेण्याच्या प्रयत्नांना चालना मिळते, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. संसदेच्या हिवाळी अधिवेशनापूर्वी ते वार्ताहरांना संबोधित करत होते. भारताचा आजचा आर्थिक विकास उल्लेखनीय आहे. या वाढीमुळे भारताला विकसित राष्ट्र बनण्याच्या मार्गावर चालण्याचा आत्मविश्वास आणि बळ मिळालं आहे, असं मोदी म्हणाले.

अठराव्या लोकसभेचं हे सहावं अधिवेशन आजपासून सुरू होत असून सर्व संसद सदस्य त्यांच्या सक्रिय सहभागाद्वारे लोकशाहीची परंपरा जपतील, अशी आशा लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशातून व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

भारत केवळ आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेनेच नव्हे तर जागतिक पातळीवरही महत्त्वाची आर्थिक भूमिका बजावत असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी म्हटलं आहे. त्या आज नवी दिल्लीत पादत्राणे डिझाईन आणि विकास संस्थेच्या दीक्षांत समारंभात बोलत होत्या. देशाच्या आर्थिक प्रगतीत पादत्राण निर्मिती उद्योगाचा मोठा वाटा असून गेल्यावर्षी तब्बल ५०० कोटी अमेरिकन डॉलर किंमतीच्या पादत्राणांची निर्मिती झाली असल्याचंही त्या म्हणाल्या.

**<><><><><>**

देशातल्या शेअर बाजारांनी आज विक्रमी पातळीला स्पर्श केला.  सकाळी व्यवहार सुरू झाल्यापासूनच बाजारात तेजी दिसून आली. सेन्सेक्सनं ८६ हजार ८६ अंकांवर झेप घेतली, तर निफ्टी २६ हजार ३११ वर पोहोचला. त्यानंतर दोन्ही निर्देशांकामध्ये मोठी घसरण पाहायला मिळाली. दुपारी एकच्या सुमाराला सेन्सेक्स सुमारे ६०० अंकांची घसरण

नोंदवत ८५ हजार ६००वर आला, तर निफ्टी साधारण १२० अकांनी घसरून २६ हजार १८५वर पोहोचला. सध्या पुन्हा दोन्ही निर्देशांकात थोडीफार तेजी दिसते आहे.

**<><><><><>**

नागालँड राज्याचा आज ६३ वा स्थापना दिवस आहे. यानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नागालँडच्या नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. नागालँडला समृद्ध सांस्कृतिक वारसा आणि निसर्ग लाभला आहे. इथलं आदिवासी जमातींचं वैविध्य आणि एकमेवाद्वितीय वारसा अभिमानास्पद आहे, असं राष्ट्रपती आपल्या संदेशात म्हणाल्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही नागालँडच्या समृद्ध सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारशाचं कौतुक केलं. नागालँडचे राज्यपाल अजय कुमार भल्ला आणि मुख्यमंत्री नेफ्यू रियो यांनीही स्थापना दिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

**<><><><><>**

नागालँडमधे आज २६ वा हॉर्नबील उत्सव कोहिमामधल्या किसामा इथं सुरू होत आहे. दहा दिवसांच्या या उत्सवात नागालँडमधल्या सर्व नागा जमाती एकत्र येतात. यात पारंपरिक कलाप्रकार, संगीत, लोककथा, हस्तकला आणि पाककृती यांचं प्रदर्शन केलं जातं. आज संध्याकाळी किसामा इथल्या उद्घाटन समारंभात राज्यपाल अजय कुमार भल्ला हे प्रमुख पाहुणे असतील. हॉर्नबील उत्सवानिमित्त राज्यभरात विविध कार्यक्रम साजरे केले जाणार आहेत.

**<><><><><>**

तामिळनाडूच्या शिवगंगा जिल्ह्यात काल रात्री दोन बस एकमेकांवर समोरासमोर धडकून झालेल्या अपघातात ११ जणांचा मृत्यू झाला असून ५४ जण जखमी झाले आहेत. शिवगंगा जिल्ह्यातल्या तिरुपात्तुल भागातल्या पिलायरपाटी जवळ हा अपघात झाला. तिरप्पुर ते काराईकुडु जाणारी बस कारायकुडी ते डिंडीगुल जिल्ह्यात जाणाऱ्या बसला समोरसमोर धडकली. स्थानिकांनी जखमी प्रवाशांना तातडीने रुग्णालयात दाखल केलं.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, उपराष्ट्रपती सीपी राधाकृष्णन यांनी या अपघाताबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही या अपघाताबद्दल दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबाला २ लाख रुपये तर जखमींना प्रत्येकी पन्नास हजार रुपये मदत

घोषित केली आहे. जखमींना लवकर बरं वाटावं, अशी सदिच्छाही त्यांनी समाजमाध्यमावर व्यक्त केली आहे.

<><><><><>

सोलापूर जिल्ह्यात बार्शी-लातूर महामार्गावर झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये तीन महिला आणि दोन पुरुषांचा समावेश आहे. विवाह सोहळ्यानंतर नवदाम्पत्याला देवदर्शनासाठी तुळजापूरला घेऊन जाणारी कार आणि भरधाव ट्रक यांची धडक होऊन हा अपघात झाला. ही धडक इतकी जोरदार होती, की कार पुलावरून खाली जाऊन तीन ते चारवेळा पलटी झाली. अपघातात दोन्ही वाहनांचं मोठं नुकसान झालं.

<><><><><>

दितवाह चक्रीवादळाचा जोर ओसरून त्याचं कमी दाबाच्या पट्प्यात रुपांतर झालं असून ते बंगालचा उपसागर आणि उत्तर तामिळनाडू तसंच पुद्दुचेरीच्या किनारी भागाकडे झुकलं आहे. गेल्या सहा तासात हे चक्रीवादळ दहा किलोमीटर प्रती तासाच्या गतीने उत्तरेकडे सरकलं असून  ते चेन्नईपासून दक्षिणेकडे ९० किलोमीटर, पुद्दुचेरीपासून दक्षिणेकडे ९० किलोमीटर आणि कुड्डलोर आणि कराईकलपासून शंभर किलोमीटर अंतरावर आहे. कमी दाबाचा पट्टा उत्तर तामिळनाडू आणि पुद्दुचेरीपासून समांतर अंतरावर तीस किलोमीटरवर असेल. यामुळे तिरूवलुर जिल्ह्यात आज जोरदार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

<><><><><>

भारत आणि दक्षिण अफ्रिका यांच्यात काल रांची इथं झालेल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारतानं दक्षिण अफ्रिकेचा १७ धावांनी पराभव केला. भारतानं प्रथम फलंदाजी करताना पन्नास षटकात ३४९ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेला ३३२ धावांवर रोखण्यात भारताला यश आलं. त्याधी दक्षिण अफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. भारतातर्फे विराट कोहलीनं आपलं ५२ वं आंतरराष्ट्रीय शतक झळकावत नाबाद १३५ धावा केल्या. रोहित शर्मानं ५७ धावा केल्या. तर कर्णधार केएल राहुलनं ६० धावा केल्या. या प्रमुख खेळाडूंच्या फलंदाजीच्या जोरावर भारतानं ३४९ धावांचा टप्पा गाठला. विजयासाठी ३५० धावा करण्याचं आव्हान घेऊन उतरलेल्या दक्षिण अफ्रिका संघाचे आघाडीचे खेळाडू झटपट बाद करण्यात भारतीय गोलंदाजांना यश आलं. त्यानंतरही

त्यांचे फलंदाज ठराविक अंतरानं बाद होत गेले. अखेर निर्धारित पन्नास षटके संपायला ४ चेंडू शिल्लक असतानाच त्यांचा डाव ३३२ धावांमध्ये आटोपला. भारतानं तीन एकदिवसीय सामन्यांच्या या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

//<><><><><>//